सकाळ

# समाजात रवळनाथ संस्थेचे नाते घट्ट

## बाबासाहेब आजरी : कुडाळ येथे सत्कार समारंभ उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

कुडाळ, ता. २७ : 'रवळनाथ'ने केवळ बँकिंग व्यवसाय न करता विविध सामाजिक उपक्रमांत नेहमी पुढाकार घेतला आहे. भावी पिढी घडवणारा शिक्षक हा घटक संस्थेचा केंद्रबिंदू आहे. विविध सामाजिक उपक्रमांतून संस्थेने समाजातील सर्व घटकांशी बँकिंगपलीकडे नाते जपले आहे,' असे गौरवोद्गार निवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी बाबासाहेब आजरी यांनी काढले.

श्री रवळनाथ को-ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटीतर्फे येथील शाखेत आयोजित सत्कार समारंभप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. येथील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव रावराणे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. रावराणे म्हणाले, ''समाजात चांगले कार्य करणाऱ्या लोकांचे कौतुक करण्याची परंपरा रवळनाथ हाउसिंग फायनान्सने कायम जपली आहे. संस्थेने केलेल्या सन्मानामुळे त्यांना काम करण्यास ऊर्जा मिळते. त्यामुळे 'रवळनाथ'चे उपक्रम प्रेरणादायी आहेत.''



**कुडाळ : येथे रवळनाथ संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बाबासाहेब आजरी. शेजारी डॉ. जयसिंगराव रावराणे, एम. एल. चौगुले, अशोक येजरे आदी. (छायाचित्र : अजय सावंत)**

श्री. चौगुले यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. प्रारंभी जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल पंढरीनाथ तेंडोलकर यांचा डॉ. रावराणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. येथील शाखेचे अध्यक्ष अशोक येजरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शाखा सल्लागार कॅप्टन डॉ. एस. टी. आवटे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य मनोहर गुरवे यांनी आभार मानले. कार्यक्रमास शाखा सल्लागार सीए सागर तेली, राजेंद्र केसरकर, रुपाली शिरसाट आदी उपस्थित होते.